# मानननीय दिवाणी न्यायालय साहेब वरिष्ठ स्तर गंगाखेड

दिवाणी दावा नं.३४२/२०२५

ORDER
Read & Recorded.

CJSD, Gangakhed.

Exh-17

वादी : गंगाबाई

विरुद्ध

प्रतिवादी : प्रकाश

वाद : मालकी मनाई आज्ञा

प्रतिवादीतर्फे खालील प्रमाणे W.S. दाखल करण्यात येत आहे.

१) असे की, वाद्पत्रातील कलम नं.०१ मधील मजकूर या हद्दीपर्यंत बरोबर आहे की, वादी बोथी येथील रहिवासी आहे व प्रतिवादी राणीसावरगाव येथील रहिवासी असून ते शेती काम व पौरहित्य करतात मात्र वादी शेतीची वहीती करून उपजीविका भागवते प्रतिवादी अत्यंत धूर्त आहेत हा मजकूर असत्य व खोटा आहे.

२) असे की, वाद्पत्रातील कलम नं. २ मधील मजकूर सन २००९ मध्ये प्रतिवादी नं.१ यांना कौटुंबिक गरजेसाठी दावा मिळकतीची विक्री करायची होती त्यांनी वादी शी संपर्क साधत मौजे राणीसावरगाव येथी; गट नं.२१८ मधील ८० आर. शेत मिळकत खरेदी करण्याबाबत विचारणा केली वादींना देखील मिळकत खरेदी करण्यामध्ये स्वारस्य असल्याने वादी व प्रतिवादी नं. १ यांच्यामध्ये दावा मिळकतीच्या खरेदी करण्याबाबत अंतिम ठराव झाला त्यानुसार दिनांक २५/०३/२००९ रोजी खरेदी खात नं.५७२/२००९ झाले हा मजकूर असत्य व खोटा आहे. मोबदला रक्कम स्वीकारून विक्री केली खरेदीच्या दिनांकपासून वादी या नमूद दावा मिळकतीच्या मालक व ताबेदार आहेत हा मजकूर असत्या व खोटा आहे.

३) असे की, वाद्पत्रातील कलम नं.३ मधील मजकूर वादी च्या नावाने फेर झाला हा बरोबर आहे फेर नं.२१५१ नंतर रद्द झाला आहे. वादी या खरेदी दिनांकापासून नमूद दावा मिळकतीची मालक व ताबेदार म्हणून वापर व उपभोग घेत आहे हा मजकूर असत्या व खोटा आहे.

४) असे की, वाद्पत्रातील कलम नं.४ मधील मजकूर प्रतिवादी नं.१ स्वार्थापोटी व वाईट हेतूने वादी विरुद्ध कार्यवाही करण्यास सुरुवात केली खोटी चुकीचे बनावटी आरोप वादीवर करत मिळकत हडपण्यासाठी अतोनात प्रयत्न केले हा मजकूर असत्या व खोटा आहे तसेच महसूल व न्यायालयीन कार्यवाह्या तथ्यहीन ,खोट्या बनावटी स्वरूपाच्या आहेत

प्रतिवादीच्या अप्रामाणिक हेतू मिळकत बळकावणे हाच आहे. हा मजकूर असत्य व खोटा आहे योग्य मोबदला देऊन विक्रीचा व्यवहार झाला आहे. त्यास वेगवेगळे बनावटी वळणे देत कार्यावाह्या करत आहे हे असत्य व खोटे आहे.

दिवाणी व महसुल प्रकारणे

अ) प्रतिवादीने दी.मु.नं. ६/२०१३ दाखल केला आहे हा बरोबर आहे. इतर प्रतीवादिंचा हक्क संबंध नव्हता रंगीन वळण वादी ला लेखी जबाब दाखल करण्यास विलंब झाल्याचा गैर फायदा घेत तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज मंजूर करून घेतला हा मजकूर असत व खोटा आहे.

आ) मा.उपविभागीय अधिकारी यांनी फेरफार नं.२१५१ चुकीच्या पद्धतीने रद्द केला हा मजकूर असत्य व खोटा आहे.

इ) अपील दाखल केले हा मजकूर बरोबर आहे

ई) प्रतिवादी नं. १ ने आयुक्त यांच्याकडे अपील दाखल केले बरोबर आहे.

उ) मा. उपविभागीय अधिकारी यांनी फेरफार नं.२१५१ रद्द केला बरोबर आहे

ऊ) मा. अप्पर आयुक्त यांनी वादी चे अपील मंजूर केले हे बरोबर आहे मात्र फेरफार २७७५ बाबतचा बनावटी खोट्या डिग्री आधारे हा मजकूर असत्य व खोटा आहे.

ऋ) तलाठी यांनी नोंदवलेला व महसूल अधिकारी यांनी मंजूर केलेला फेरफार नं.३७०४ चुकीचा आहे

ऌ) मा. महसूल मंत्री मंत्रालय मुंबई यांच्याकडे रिव्हिजन प्रलंबित आहे हे बरोबर आहे

ऍ) मा. उपविभागीय अधिकारी यांनी फेरफार नं.३७०४ योग्यरीत्या रद्द केला आहे

ऎ) अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे बरोबर आहे

५) असे की, वादपत्रातील कलम नं. ५ मधील मजकूर प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी अत्यंत धूर्तपणे व चाणाक्षपणे न्यायालयाची फसवणूक करून प्रकरणात गुंतागुंत निर्माण करण्याकरता कागदोपत्री पुरावा तयार करण्याकरिता फ्रॉड करून बनावटी खोट्या व लबाडीने डिग्री हस्तगत केली आहे महसूल प्राधिकरण मनमानी प्रकरणाने आदेश पारित करत आहे हा मजकूर असत्य व खोटा आहे.

६) असे की, वादपत्रातील कलम नं. ६ मधील मजकूर प्रतिवादींनी संगनमताने बनावटी फ्रॉड करून दिवाणी दावा २१८/२०१६ तडजोडी आधारे संपुष्ठात आणला दावा मिळकत

वादीच्यास ताब्यात आहे हुकूमनामा वाडीवर बंधनकारक नाही. दावा मिळकत वादी ची आहे प्रतिवादी नं. १ ने दिलेली वाटणी बेकायदेशीर ठरते वगैरे मजकूर असत्य व खोटा आहे.

७) असे की, वाद्पत्रातील कलम नं. ७ मधील मजकूर प्रतीवादिनी आपापसातील संगनमताने दावा नं.४८/२०२२ दाखल करून त्यात बनावटी तडजोड केले हा मजकूर असत्य व खोटा आहे.

८) असे की, वाद्पत्रातील कलम नं. ८ मधील मजकूर दुसरी बनावटी डिग्री न्यायालयाची दिशाभूल करून हस्तगत करून घेतली आहे. प्रतिवादी चा दुटप्पीपणा अधोरेखित करते प्रतिवादी न्यायालयाची दिशाभूल करून दावा नं.६/२०१३ मध्ये पुरावा देत आहेत वादी विरुद्ध महसुली प्रकरणे बिनधास्तपणे चालवीत आहेत हा मजकूर असत्य व खोटा आहे.

९) असे की, वाद्पत्रातील कलम नं. ९ मधील मजकूर प्रतिवादी नं. ४ बनवत डिग्रीचा फायदा घेत आहेत महसुली न्यायालय हे निष्कारणपणे प्रतीवादिंनी केलेल्या तडजोडीच्या कोर्ट डिग्रीला प्रभावात होऊन वादी च्या प्रकरणातील गुणवत्तेत संपूर्णपणे दुर्लक्षित करत आहेत सारासार विचार करत नाहीत खोट्या व बनावटी डिग्री च्या प्रभावाखाली येऊन वाची चे हक्क व अधिकार डावलत आहे वगैरे मजकूर असत्य आहे वादी ची न्यायालयीन हुकुमनामे बंधनकारक नसल्याची मागणी चूक व बेकायदेशीर आहे.

१०) असे की, वाद्पत्रातील कलम नं. १० मधील मजकूर टीपिटीशन पुनरावृत्ती आहे हुकुमनामे बंधनकारक नसल्याची मागणी चूक व बेकायदेशीर आहे.

११) असे की, वाद्पत्रातील कलम नं.११ मधील मजकूर प्रतिवादीच्या डिग्रीचा अनावधानाने महसूल न्यायालयावर प्रभाव पडत आहे हा मजकूर असत्य व खोटा आहे मालकिची घोषणा करून मिळणेची मागणी बेकायदेशीर व चुकीची आहे.

१२) असे की, वाद्पत्रातील कलम नं. १२ मधील मजकूर दावा नं. ६/२०१३ infrustuous झाला आहे. हा मजकूर असत्य व खोटा आहे वादी चे अर्ज अमान्य आहेत.

१३) असे की, वाद्पत्रातील कलम नं. १३ मधील मजकूर वादी ने शेवटी प्रतीवादिना विनंती केली प्रतीवादिनी ८/६/२०२५ रोजी इन्कार केला हा मजकूर खोटा आहे कलम १४ ते १६ कायदयाचे असल्याने निवेदन करण्याची गरज नाही वाद्पत्र मुदतीत नाही.

## अधिक निवेदन

१४) असे की, वस्तुस्थिती अशी आहे की, वादी चे वाद्पत्र असत्य निवेदनावर आधारित आहे.वादी वाद शेताची मालक नाही वादी चा वाद शेतावर ताबा नाही वादीस वाद्पत्र सादर करण्याचे couse of action नाही,तसेच वादपात्रातील ज्या मागण्या आहेत त्या मुदतीच्या बाहेर आहेत वाद्पत्र मुदतीत दाखल नाही. त्यामुळे वादी चे वाद्पत्र खारीज करण्यात यावे.

१५) असे की, प्रतिवादीने वादी विरुद्ध दावा नं.६/२०१३ दाखल केले आहे जे अद्याप प्रलंबित आहे. वादीस त्या वाद्पत्रात प्रस्तुत वाद्पत्रातील मागण्याबाबत counter claim दाखल करावयास हवा होता. वादीस संधी व हक्क होता तसे न करता वादी ने पुन्हा अकारण प्रस्तुत वाद्पत्र सादर करून multiplication ऑफ suit केले आहे या मुद्यावर वादीचे वाद्पत्र खारीज करण्यात यावे. कारण वाद्पत्र मुदतीच्या बाहेर आहे मुदतीत दाखल केलेले नाही.

१६) असे की, दावा नं.६/२०१३ मधील लेखी निवेदनात वादी ने ती वाद शेताची मालक ताबेदार आहे त्या वाद्पत्रातील वादी मालक कब्जेदार नाही असे कथन करीत दावा नं.६/२०१३ ला नकार दिला आहे. त्यामुळे या वाद्पात्रातील मागणी नं.१ बाबत वादी स cause of action नाही मागणी नं.२ ते ४ मागणी नं.१ वर आधारित आहेत त्यामुळे ०७ आर ११ तहत वाद्पत्र खारीज करण्यात यावे.

१७) असे की, दावा नं.२१८/२०१६ मध्ये दिनांक १५/१०/२०१६ रोजी तडजोड डिग्री झाली आहे ही तडजोड डिग्री झाल्याची माहिती वादी ला अपीलमध्ये २०१७ रोजी झाली. तेव्हापासून ३ वर्षाचे आत वादी ने दावा नं.२१८/२०१६ मधील डिग्री बंधनकारक नसल्याचे जाहीर करणेची मागणी करावयास हवी होती. वादी ने ९ वर्षांनी २४/०६/२०२५ रोजी मागणी केली आहे. वादी ची मागणी मुदतीत नाही. वाद्पत्र मुदतबाह्य आहे या कायदेशीर मुद्यावर वाद्पत्र खारीज करण्यात यावे. वाद्पंत्र नं.६/२०१३ यात प्रतिवादी सतीश आवश्यक पक्षकार झाल्यामुळे विद्यमान कोर्टाच्या आदेशाने शरिक झाला आहे. याची माहिती वादीस होती त्यामुळे प्रस्तुत वाद्पत्र मुदतीत नाही.

१८) असे की, प्रतिवादी नं.१ चा मुलगा प्रतिवादी २ कल्याण पिता प्रकाश पुराणिक याचे शिक्षण १२ पर्यंत झाले आहे. वादी वादीचा मुलगा बाळासाहेब पत्नी करून यांची संत गाडगेबाबा कला व विद्यान कनिष्ठ महाविद्यालय आहे. बाळासाहेब रामजी कुंडगीर यांनी प्रतिवादी नं.२ वरील महाविद्यालयामध्ये लॅब असीस्टंट या पदावर नौकारीस घेनाची तयारी दर्शवली व सन २००८ मध्ये प्रतिवादी नं.२ ला लॅब असीस्टंट या पदावर नौकारीस घेतले व महाविद्यालयासाठी इमारत लहान पडत आहे नवीन इमारत बांधायाची आहे त्यासाठी प्रतिवादी नं.१ ने राणीसावरगाव रस्त्याजवळील गट नं.२१८ मधील ८० आर शेती चे खरेदीखत करून दिले तर प्रतिवादी नं.२ ला नौकरीत कायम करून त्याचा पगार सुरु केला जाईल असे सांगितले.

१९) असे की, प्रतिवादी नं.१ ने आपल्या मुलाचे म्हणजे प्रतिवादी नं. २ च्या भवितव्यासाठी क्षेत्रफळ ८० आर चे खरेदीखत करून देण्याचे मान्य केले. दिनांक २४/०३/२००९ रोजी त्याच्या मध्ये लेखी करार झाला की, बाळासाहेब कुंडगीर चे सांगणे प्रमाणे कल्याण पुराणिक याला लॅब असीस्टंट पदावर कायम स्वरूपी नौकारीवर घेण्यासाठी डोनेशन स्वरुपात गट नं.२१८ मधील ८० आर जमिनीचे विनामूल्य विना मावेजा खरेदीखत करून दयायचे व कल्याण याच्या नौकरीची पूर्तता न झाल्यास जमीन वापस देण्याचे ठरले. सादर करारनामा सखाराम शंकर बीडगर प्राचार्य यांनी बाळासाहेब यांच्या वतीने करून दिला. ठरल्याप्रमाणे त्यांच्यावर विश्वास ठेऊन मुलाच्या नौकरीसाठी खरेदीखत ५७२/२००९ बालासाहेबाची आई गंगाबाई कुंडगीर नावाने २५/०३/२००९ रोजी करून दिले. खरेदीखताचे असे ठरले होते की, कल्याण यास क़ायम स्वरूपी ऑर्डर दिल्यानंतर पगार सुरु झाल्यानंतर शेताचा ताबा दयायचा तोपर्यंत फेर्लावाला जाणार नाही. सदरील खरेदीखत कायदयाच्या विरुद्ध तसेच public policy च्या विरुद्ध असल्यामुळे बेकायदेशीर आहे.

२०) असे की, खरेदीखत झाल्यानंतर कल्याण ला नौकरीची ऑर्डर दिली नाही पगार दिला नाही उलट नौकरीवरून काढून टाकले त्यामुळे वादी ला शेताचा ताबा मिळाला नाही. वादी ने बेकायदेशिरपणे फेर करून घेतला त्याचे अपील होऊन फेरफार २१५१ रद्द झाला. प्रतिवादीने वादी च्या नावाने झालेले खरेदीखत करणेसाठी दावा नं.६/२०११३ दाखल केला जो वादीने प्रलंबित ठेवला आहे. म्हणून वादी चे प्रस्तुत वाद्पत्र कायदेशीर नसल्याचे जाहीर करावे व खारीज करावे.

२१) असे की, वादी वादी चा मुलगा बालासाहेब सून करुणाबाई व प्राचार्य सखाराम बीडकर यांनी प्रतीवाडीची फसवणूक केल्याबद्दल प्रतिवादी प्रकाशने त्यांच्या विरुद्ध मा. न्यायदंडाधिकारी प्र.व.गंगाखेड येथे कलम ४१५,४१८,४२०,४६७,४७१ भा.द.वि. तहत केस नं.५०/२०१७ दिनांक २९/०५/२०१७ रोजी दाखल केली त्यात दिनांक २८/०२/२०१८ रोजी कलम २०२ CRPC तहत इनव्हेस्टीगेशनसाठी पोलीस कडे पाठवणीचा आदेश झाला पोलीसने इनव्हेस्टीगेशन करून अहवाल पाठवला त्यावर दिनांक ३१/०१/२०२५ रोजी आरोपी विरुद्ध कलम ४१५,४१८,४२०,४२३,४६७,४६८,४०६,५०४,५०६,व ३४ अन्वये प्रोसेस ईशु करण्यात येथे असा आदेश झाला आहे. तसेच सखाराम बीडगर यांनी प्रतिवादीच्या विरुद्ध दाखल केलेली फौजदारी केस पोलिसांनी तपास करून B final केली आहे.

२२) असे की, गुडीपाडवा २०१६ ला प्रतिवादीच्या कुटुंबातील जायजादच्या वाटण्या झाल्या. वाटणीमध्ये वाद शेतासह गट नं.२१८ मधील क्षेत्र ४ हे १८ आर मौजे राणीसावरगाव प्रतिवादी सतीश ला मिळाले. त्याबाबत दावा नं.२१८/१६ मध्ये दिनांक १५/१०/२०१६ ला तडजोड डिग्री झाली आहे. त्यानंतर सदाशिव व शारदा यांनी सतीश विरुद्ध दावा नं.४८/२०२२ वाटणी मिळणेसाठी दिनांक ०४/०२/२०२२ रोजी दाखल केले त्यात वाटणीची तडजोड दिनांक १२/०३/२०२२ रोजी होऊन वाद शेतासह गट नं.२१८ क्षेत्र ४ एकर १८ गुंठे सदाशिवला देण्यात आली आहे. प्रतिवादी सदाशिव सादर शेताचा मालक झाला आहे. सदर तडजोड दिनांक १२/०३/२०२२ च्या लोकन्यायालयात झाली आहे त्यामुळे रद्द करून मागता येत नाही. तसेच वाद शेती अज्ञानाला मिळाली आहे.

२३) असे की, खरेदीखत नं.५७२/२००९ बाबत वादी ने केलेले कथन खोटे व चुकीचे आहे. वयोवृद्ध वादीने खरेदीचा ठराव केलेला नाही. प्रतिवादीच्या कुटुंबात १९ ते २० एकात शेती आहे.कुटुंबात दोघे जजण पौरहित्य व्यवसाय करतात त्यामुळे त्यांना शेती विक्री करणेची गरज नव्हती प्रतीवादिनी कधीही कोणतेही शेत पैसे घेऊन विक्री केले नाही नौकरीसाठी शेती विक्री झाली,खरेदीखताचा प्रोफार्मा असतो त्यात मोबदला दिला ताबा दिला असे लिहावे लागते त्याशिवाय खरेदीखत नौंदवल्या जाऊ शकत नाही त्यामुळे खरेदीखतात मोबदला दिला ताबेसह खरेदीखत करून दिले असे लिहिले आहे प्रत्यक्षात खरेदीखत विना मोबदला व विना ताबा आहे. याबाबत चा साक्षपुरावा वादपत्र ६/२०१३ यात प्रतिवादी तर्फे करण्यात आला आहे.

२४) असे की, वादी यांचा मुलगा सून त्यांच्या वर्तनाबाबत निवेदन करण्यात येते की,प्रतिवादी कल्यानने २००८ ते २०१२ या कालावधी मध्ये लॅब असीस्टंट म्हणून काम केल परीक्षेत गार्डिंग चे काम ,पेपर तपासण्याचे काम केले आहे. परंतु वादी ने दावा नं.६/२०१३ मध्ये कल्याण नौकारीस होता हे सर्वस्वी चुकीचे व खोटे आहे. असे WS मध्ये कथन केले आहे. तर फौजदारी नं.५०/२०१७ मध्ये चौकशी मध्ये पोलीसने करुणाबाई कुंडगीरचे बयान घेतले त्यात सन २००८ मध्ये मी अध्यक्ष असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर जागा रिक्त होती त्यानुसार तात्पुरते कंत्राटी म्हणून २०११ पर्यंत कल्याण कार्यरत होता असे कथन केले आहे. ते खोटे बोलतात.

२५) असे की, खरेदीखत ५७२/२००९ प्रतिवादी कल्याण यांच्या नौकरीसाठी डोनेशन स्वरुपात झाले आहे. कल्याण यांना नौकरी दिली नाही त्यामुळे Conditional saledeed निष्प्रभ आहे. अशा खरेदिखताआधारे वादी मालक नाही, वादीचा ताबा नाही कोर्ट डिग्री कायदेशीर आहेत या परीस्थितीत वादीची केस प्रथमदर्शनी सिद्ध नाही. वादी कायदेशीर तत्वाने न्यायालयात आली नाही. तसेच सदरील खरेदीखत हे public policy च्या विरुद्ध आहे. कायदेशीर नाही त्याचा मोबदला हा नौकरी कायमस्वरूपी देण्याचा होता म्हणून हे void आहे. वादपत्र ६/२०१३ यात प्रतिवादीच्या हक्कात EX ५ (निशाणी ५) हा मंजूर झाला आहे व वादीस वादग्रस्त शेतामध्ये आडीहरकती करू नये म्हणून पाबंद केलेले आहे. तो आदेश अद्याप कायम आहे. त्यामुळे तात्पुरता मनाई आदेश अर्ज खारीज करण्यात यावा.

## विनंती की,

प्रतिवादींचे लेखीनिवेदन स्वीकारून वादीचे वाद्पंत्र प्रतिवादी विरुद्ध खर्चासह खारीज करण्यात यावे.

दिनांक : २९/०९/२०२५

प्रतिवादी

कल्याण प्रकाश पुराणिक

सतीश सदाशिव पुराणिक

सदाशिव सतीश पुराणिक अ.पा.क. आई
शारदा भ्र. सतीश पुराणिक
सर्व रा. राणीसावरगाव

तसदिक

आम्ही प्रतिवादी ३ ते ४ शपथेवर निवेदन करतो की , आमच्या लेखी निवेदन मधील सर्व मजकूर हा खरा असुन्ब आज रोजी तसदिक करण्यात येत आहे.

दिनांक : २९/०९/२०२५

प्रतिवादी

कल्याण प्रकाश पुराणिक

सतीश सदाशिव पुराणिक

सदाशिव सतीश पुराणिक अ.पा.क. आई
शारदा भ्र. सतीश पुराणिक
सर्व रा. राणीसावरगाव

तर्फे :
Adv. श्रीकांत तर्कसे
गंगाखेड

# मानगीय दिवाणी न्यायालय साहेब वरिष्ठ स्तर गंगाखेड

दिवाणी दावा नं.३४२/२०२५

वादी : गंगाबाई

विरुद्ध

प्रतिवादी : प्रकाश

वाद : मालकी मनाई आज्ञा

## शपथपत्र

मी सतीश सदाशिवराव पुराणिक वय ४० वर्ष धंदा शेती व पोरहीत्य रा. राणीसावरगाव शपथेवर निवेदन करतो की, मी व माझा भाऊ कल्याण व माझा मुलगा सदाशिव यांच्या तर्फे जे लेखी निवेदन दाखल केले आहे ते खरे व बरोबर आहे.वस्तुस्थिती अशी आहे की, वादी चे वादपत्र असत्य निवेदनावर आधारित आहे.वादी वाद शेताची मालक नाही वादी चा वाद शेतावर ताबा नाही वादीस वादपत्र सादर करण्याचे couse of action नाही,तसेच वादपात्रातील ज्या मागण्या आहेत त्या मुदतीच्या बाहेर आहेत वादपत्र मुदतीत दाखल नाही. त्यामुळे वादी चे वादपत्र खारीज करण्यात यावे.प्रतिवादीने वादी विरुद्ध दावा नं.६/२०१३ दाखल केले आहे जे अद्याप प्रलंबित आहे. वादीस त्या वादपत्रात प्रस्तुत वादपत्रातील मागण्याबाबत counter claim दाखल करावयास हवा होता. वादीस संधी व हक़्क़ होता तसे न करता वादी ने पुन्हा अकारण प्रस्तुत वादपत्र सादर करून multiplication ऑफ suit केले आहे या मुद्यावर वादीचे वादपत्र खारीज करण्यात यावे. कारण वादपत्र मुदतीच्या बाहेर आहे मुदतीत दाखल केलेले नाही.दावा नं.६/२०१३ मधील लेखी निवेदनात वादी ने ती वाद शेताची मालक ताबेदार आहे त्या वादपत्रातील वादी मालक कब्जेदार नाही असे कथन करीत दावा नं.६/२०१३ ला नकार दिला आहे. त्यामुळे या वादपात्रातील मागणी नं.१ बाबत वादी स cause of action नाही मागणी नं.२ ते ४ मागणी नं.१ वर आधारित आहेत त्यामुळे ०७ आर ११ तहत वादपत्र खारीज करण्यात यावे.दावा नं.२१८/२०१६ मध्ये दिनांक १५/१०/२०१६ रोजी तडजोड डिग्री झाली आहे. ही तडजोड डिग्री झाल्याची माहिती वादी ला अपीलमध्ये २०१७ रोजी झाली. तेव्हापासून ३ वर्षाचे आत वादी ने दावा नं.२१८/२०१६ मधील डिग्री बंधनकारक नसल्याचे जाहीर करणेची मागणी

Superintendent C.J.S.D. Court Gangakhed

करावयास हवी होती. वादी ने ९ वर्षांनी २४/०६/२०२५ रोजी मागणी केली आहे. वादी ची मागणी मुदतीत नाही. वाद्पत्र मुदतबाह्य आहे या कायदेशीर मुद्यावर वाद्पत्र खारीज करण्यात यावे. वाद्पत्र नं.६/२०१३ यात प्रतिवादी सतीश आवश्यक पक्षकार झाल्यामुळे विद्यमान कोर्टाच्या आदेशाने शरिक झाला आहे. याची माहिती वादीस होती त्यामुळे प्रस्तुत वाद्पत्र मुदतीत नाही.प्रतिवादी नं.१ चा मुलगा प्रतिवादी २ कल्याण पिता प्रकाश पुराणिक याचे शिक्षण १२ पर्यंत झाले आहे. वादी वादीचा मुलगा बाळासाहेब पत्नी करून यांची संत गाडगेबाबा कला व विद्यान कनिष्ठ महाविद्यालय आहे. बाळासाहेब रामजी कुंडगीर यांनी प्रतिवादी नं.२ वरील महाविद्यालयामध्ये लॅब असीस्टंट या पदावर नौकारीस घेनाची तयारी दर्शवली व सन २००८ मध्ये प्रतिवादी नं.२ ला लॅब असीस्टंट या पदावर नौकारीस घेतले व महाविद्यालयासाठी इमारत लहान पडत आहे नवीन इमारत बांधायाची आहे त्यासाठी प्रतिवादी नं.१ ने राणीसावरगाव रस्त्याजवळील गट नं.२१८ मधील ८० आर शेती चे खरेदीखत करून दिले तर प्रतिवादी नं.२ ला नौकरीत कायम करून त्याचा पगार सुरु केला जाईल असे सांगितले.प्रतिवादी नं.१ ने आपल्या मुलाचे म्हणजे प्रतिवादी नं. २ च्या भवितव्यासाठी क्षेत्रफळ ८० आर चे खरेदीखत करून देण्याचे मान्य केले. दिनांक २४/०३/२००९ रोजी त्याच्या मध्ये लेखी करार झाला की, बाळासाहेब कुंडगीर चे सांगणे प्रमाणे कल्याण पुराणिक याला लॅब असीस्टंट पदावर कायम स्वरूपी नौकारीवर घेण्यासाठी डोनेशन स्वरुपात गट नं.२१८ मधील ८० आर जमिनीचे विनामूल्य विना मावेजा खरेदीखत करून द्यायचे व कल्याण याच्या नौकरीची पूर्तता न झाल्यास जमीन वापस देण्याचे ठरले. सादर करारनामा सखाराम शंकर बीडगर प्राचार्य यांनी बाळासाहेब यांच्या वतीने करून दिला. ठरल्याप्रमाणे त्यांच्यावर विश्वास ठेऊन मुलाच्या नौकरीसाठी खरेदीखत ५७२/२००९ बालासाहेबाची आई गंगाबाई कुंडगीर नावाने २५/०३/२००९ रोजी करून दिले. खरेदीखताचे असे ठरले होते की, कल्याण यास कायम स्वरूपी ऑर्डर दिल्यानंतर पगार सुरु झाल्यानंतर शेताचा ताबा द्यायचा तोपर्यंत फेर्लावाला जाणार नाही. सदरील खरेदीखत कायद्याच्या विरुद्ध तसेच public policy च्या विरुद्ध असल्यामुळे बेकायदेशीर आहे.खरेदीखत झाल्यानंतर कल्याण ला नौकरीची ऑर्डर दिली नाही पगार दिला नाही उलट नौकरीवरून काढून टाकले त्यामुळे वादी ला शेताचा ताबा मिळाला नाही. वादी ने बेकायदेशिरपणे फेर करून घेतला त्याचे अपील होऊन फेरफार २१५१ रद्द झाला. प्रतिवादीने वादी च्या नावाने झालेले खरेदीखत करणेसाठी दावा नं.६/२०११३ दाखल केला जो वादीने प्रलंबित ठेवला आहे. म्हणून वादी चे प्रस्तुत वाद्पत्र कायदेशीर नसल्याचे जाहीर करावे व खारीज

Superintendent
C.J.S.D.Court
Gangakhed

करावे. वादी व वादी चा मुलगा बालासाहेब सून करुणाबाई व प्राचार्य सखाराम बीडकर यांनी प्रतीवाडीची फसवणूक केल्याबद्दल प्रतिवादी प्रकाशने त्यांच्या विरुद्ध मा. न्यायदंडाधिकारी प्र.व.गंगाखेड येथे कलम ४१५,४१८,४२०,४६७,४७१ भा.द.वि. तहत केस नं.५०/२०१७ दिनांक २९/०५/२०१७ रोजी दाखल केली त्यात दिनांक २८/०२/२०१८ रोजी कलम २०२ CRPC तहत इनव्हेस्टीगेशनसाठी पोलीस कडे पाठवणीचा आदेश झाला पोलीसने इनव्हेस्टीगेशन करून अहवाल पाठवला त्यावर दिनांक ३१/०१/२०२५ रोजी आरोपी विरुद्ध कलम ४१५,४१८,४२०,४२३,४६७,४६८,४०६,५०४,५०६,व ३४ अन्वये प्रोसेस ईशु करण्यात येथे असा आदेश झाला आहे. तसेच सखाराम बीडगर यांनी प्रतिवादीच्या विरुद्ध दाखल केलेली फौजदारी केस पोलिसांनी तपास करून B final केली आहे.गुडीपाडवा २०१६ ला प्रतिवादीच्या कुटुंबातील जायजादच्या वाटण्या झाल्या. वाटणीमध्ये वाद शेतासह गट नं.२१८ मधील क्षेत्र ४ हे १८ आर मौजे राणीसावरगाव प्रतिवादी सतीश ला मिळाले. त्याबाबत दावा नं.२१८/१६ मध्ये दिनांक १५/१०/२०१६ ला तडजोड डिग्री झाली आहे. त्यानंतर सदाशिव व शारदा यांनी सतीश विरुद्ध दावा नं.४८/२०२२ वाटणी मिळणेसाठी दिनांक ०४/०२/२०२२ रोजी दाखल केले त्यात वाटणीची तडजोड दिनांक १२/०३/२०२२ रोजी होऊन वाद शेतासह गट नं.२१८ क्षेत्र ४ एकर १८ गुंठे सदाशिवला देण्यात आली आहे. प्रतिवादी सदाशिव सादर शेताचा मालक झाला आहे. सदर तडजोड दिनांक १२/०३/२०२२ च्या लोकन्यायालयात झाली आहे त्यामुळे रद्द करून मागता येत नाही. तसेच वाद शेती अज्ञानाला मिळाली आहे.खरेदीखत नं.५७२/२००९ बाबत वादी ने केलेले कथन खोटे व चुकीचे आहे. वयोवृद्ध वादीने खरेदीचा ठराव केलेला नाही. प्रतिवादीच्या कुटुंबात १९ ते २० एकात शेती आहे.कुटुंबात दोघे जजण पौरहित्य व्यवसाय करतात त्यामुळे त्यांना शेती विक्री करणेची गरज नव्हती प्रतीवादिनी कधीही कोणतेही शेत पैसे घेऊन विक्री केले नाही नौकरीसाठी शेती विक्री झाली,खरेदीखताचा प्रोफार्मा असतो त्यात मोबदला दिला ताबा दिला असे लिहावे लागते त्याशिवाय खरेदीखत नौंदवल्या जाऊ शकत नाही त्यामुळे खरेदीखतात मोबदला दिला ताबेसह खरेदीखत करून दिले असे लिहिले आहे प्रत्यक्षात खरेदीखत विना मोबदला व विना ताबा आहे. याबाबत चा साक्षपुरावा वादपत्र ६/२०१३ यात प्रतिवादी तर्फे करण्यात आला आहे. खरेदीखत ५७२/२००९ प्रतिवादी कल्याण यांच्या नौकरीसाठी डोनेशन स्वरुपात झाले आहे. कल्याण यांना नौकरी दिली नाही त्यामुळे Conditional saledeed निष्प्रभ आहे. अशा खरेदिखताआधारे वादी मालक नाही, वादीचा ताबा नाही कोर्ट डिग्री कायदेशीर आहेत या परीस्थितीत वादीची केस प्रथमदर्शनी सिद्ध नाही. वादी

Superintendent C.J.S.D. Court Gangakhed

कायदेशीर तत्वाने न्यायालयात आली नाही. तसेच सदरील खरेदीखत हे public policy च्या विरुद्ध आहे. कायदेशीर नाही त्याचा मोबदला हा नौकरी कायमस्वरूपी देण्याचा होता म्हणून हे void आहे. वादपत्र ६/२०१३ यात प्रतिवादीच्या हक्कात EX ५ (निशाणी ५) हा मंजूर झाला आहे व वादीस वादग्रस्त शेतामध्ये आडीहरकती करू नये म्हणून पाबंद केलेले आहे. तो आदेश अद्याप कायम आहे. त्यामुळे तात्पुरता मनाई आदेश अर्ज खारीज करण्यात यावा. करिता शपथपत्र देत आहे ते खरे व बरोबर आहे.

दिनांक : २६/०९/२०२५

प्रतीज्ञक

सतीश सदाशिवराव पुराणिक

रा.राणीसावरगाव

## तसदिक

मी सतीश सदाशिव पुराणिक शपथेवर निवेदन करतो की ,माझ्या शपथपत्रा मधील मजकूर हा खरा व बरोबर आहे. करिता आज रोजी तसदिक करण्यात येते.

दिनांक : २६/०९/२०२५

प्रतीज्ञक

सतीश सदाशिवराव पुराणिक

रा.राणीसावरगाव

AFFIDAVIT

Solomnly affirmed before me tr

Satish Sadashiv Puranik

who is identified before me by

Adv. S. D. Tarkase

to whom I know personally

Asstt Superintendent

Civil Judge J.D. & JMFC Court

Gangakhed

Exh-18

# विद्यमानं वरिष्ठ दिवाणी न्यायालय गंगाखेड

वाद्पत्र नं.३४२/२०२५

वादी : गंगाबाई

विरुद्ध

प्रतिवादी : प्रकाश वगैरे

वाद: शास्वत निषेध्र आज्ञा

ORDER
Seen & filed.
CJSD, Gangakhed.

प्रतिवादी २ ते ४ तर्फे खालील प्रमाणे पुरसीस देण्यात येत आहे.

असे की, आज रोजी प्रतिवादी तर्फे वाद्पत्राचे लेखी निवेदन दाखल करण्यात येत आहे तेच वादीच्या निशाणी ५ च्या अर्जाचा से म्हणून ट्रिट करण्यात यावा म्हणून हि पुरसीस देण्यात येत आहे.

करिता हि पुरसीस

दिनांक : २९/०९/२०२५

प्रतिवादी

२ ते ४

तर्फे
Adv. श्रीकांत तर्कसे
गंगाखेड